## भेदून अंतराळा....

झालेत केस रुपेरी, थकलित गात्रे सारी
शिणल्या डोळ्यात पाही, माय वाट लेकराची

स्मशानात जळले, शव एक माऊलीचे
उघडे तिथेच पडले, वात्सल्य दीनवाणे

भेदून अंतराळा, उठला निनाद कंठी
कौतुकास त्याच्या मातेसमान न कोणी

डोक्यावरी भाराचे, ओझे कसे म्हणावे ?
पोटातल्या भुकेने, पुढे चालते करावे

डोईवरी देवीचा, देव्हारा मळवटात
'जडपाऊली' मागे, ती जोगवा उन्हात

डंका फुका स्वत:चा, का वाजवी जगात
होता पितळ उघडे, तो दांभिक एकमात्र

केलास दंश जीवा, वाटे खरा नसावा
गवतात लपलेला, नागच मित्र निघाला

बेफिकीर वादळाचा, कल्लोळ सागरात
काठावरील घरटी, चिवचिव शांत शांत

माथ्यावरी ढगांचे, ओझेच अंधारले
फुटली दहीहंडी, मोकळे नभ झाले

काळ्या निळ्या आकाशी, चांदणे गच्च भरले
झाडा झाडांवरून, झोपी काजवे गेले

**जयश्री माने**